# प्रेस नोट

**लाच स्विकारल्या प्रकरणी आरोपीस ४ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूरच्या कारवाईस यश.**

नागपूर, दि. २७/०८/२०२६: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचेकडून करण्यात आलेल्या कारवाईतील एका लाच प्रकरणामध्ये मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांनी आरोपीस दोषी ठरवून कारावास व दंडाची शिक्षा सुनावली आहे.

पोलीस ठाणे हुडकेश्वर, नागपूर शहर येथे अप.क्र. ३५८८/२०१५, कलम ७, १३(१)(ड) सहकलम १३(२), भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये नोंद असलेल्या गुन्ह्यात आरोपी श्री. खिलावन गुणाराम लांजेवार, सफाई कामगार (वर्ग-३), अतिरिक्त कार्यभार स्वास्थ्य निरीक्षक, कार्यालय हनुमाननगर झोन क्र. ३, महानगरपालिका, नागपूर याच्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणाचा स्पेशल केस क्र. ४३/२०१६ असा आहे.

सदर प्रकरणात तक्रारदार महिला कामावर गैरहजर असतानाही आरोपीने त्यांची हजेरी दाखवून पूर्ण पगार काढून दिला होता. त्याच्या मोबदल्यात आरोपीने तक्रारदार महिलेकडे ४,०००/-रु. लाचेची मागणी केली होती. त्यापैकी रु. ३,०००/-रु. तत्काळ व उर्वरित रक्कम पुढील महिन्यात देण्यास सांगून आरोपीने रु. ३,०००/-रु. लाच स्वीकारली होती. त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला होता.

सदर खटल्याची सुनावणी मा. श्री. एस. एच. ग्वालानी, जिल्हा न्यायाधीश क्र. १ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांच्या न्यायालयात झाली. खटल्यामध्ये एकूण ०५ साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली व दिनांक २७/०८/२०२६ रोजी मा. न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवून पुढीलप्रमाणे शिक्षा सुनावली.

१) कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये ३ वर्षे साधा कारावास व रु. १०,०००/- दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास.

२) कलम १३(१)(ड) सहकलम १३(२), भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये ४ वर्षे सश्रम कारावास व रु. १०,०००/- दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास.

सदर गुन्ह्याचा तपास श्री. मनोज गभने, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केला. न्यायालयीन कामकाजामध्ये सरकारी पक्षातर्फे श्री. अभय जिकार, सरकारी वकील यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

मा. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि. नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि. नागपूर आणि श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि. नागपूर यांचे मार्गदर्शनात कोर्ट पैरवी पो.नि. मयुर चौरसिया, पोहवा. प्रकाश धमगाये, राहुल बारई व मपोअं. अश्विनी मोहोड यांनी तसेच वॉरंट/समन्स बजावणीसाठी पोहवा. विलास इंगळे यांनी कामकाज पार पाडले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रभावी तपास, साक्षीदारांचे पुरावे व सक्षम न्यायालयीन पैरवीमुळे सदर प्रकरणात दोषसिद्धी प्राप्त झाली.